“महाराष्ट्रात बळी पडलेल्या व्यक्तींकरिता नुकसानभरपाई योजना, २०१४” याकरिता सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात मंजूर अनुदानापैकी आणखी २० टक्के रक्कम वितरित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्रमांक-पीडब्लूएफ-०८१७/प्र.क्र.४५०/पोल-७.

मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.

दिनांक १५ नोव्हेंबर २०१७.

<u>वाचा</u> :- १) महाराष्ट्र राज्य विधि सेवा प्राधिकरण यांचे पत्र क्रमांक म.रा.वि.से.प्रा./२०१७/१०१३, दिनांक १०.०७.२०१७.

२) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक पीडब्लुएफ-०८१७/प्र.क्र.४५०/पोल-७, दिनांक ०३.०८.२०१७.

<u>प्रस्तावना</u>.-

“महाराष्ट्रात बळी पडलेल्या व्यक्तींकरिता नुकसानभरपाई योजना, २०१४” याकरिता सन २०१७-१८ या वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पात रु.६०,००,०००/- (रुपये साठ लक्ष फक्त) इतके अनुदान मंजूर करण्यात आले आहे. त्यापैकी ७० टक्के रक्कम अर्थात रु.४२,००,०००/- (रुपये बेचाळीस लक्ष फक्त) वितरित करण्यास शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक पीडब्लूएफ-०८१७/प्र.क्र.४५०/पोल-७, दिनांक ०३.०८.२०१७, द्वारे मंजूरी देण्यात आली होती. यापैकी रु.३४ लक्ष पेक्षा अधिक रक्कम खर्च झाली आहे.

२. उक्त योजनेखाली नुकसानभरपाई देण्यासाठी एकूण रु.१,०१,४५,३००/- इतक्या निधीची आवश्यकता आहे, असे महाराष्ट्र राज्य विधि सेवा प्राधिकरण यांचे पत्र क्रमांक म.रा.वि.से.प्रा./२०१७/१०१३, दिनांक १०.०७.२०१७, द्वारे शासनास कळविण्यात आले आहे. म्हणून, एकूण मंजूर अनुदानातील शेष रक्कम वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय.-

“महाराष्ट्रात बळी पडलेल्या व्यक्तींकरिता नुकसानभरपाई योजना, २०१४” याकरिता सन २०१७-१८ या वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पात मंजूर अनुदानातील शेष रकमेपैकी **रु.१२ लक्ष *(रुपये बारा लक्ष)*** सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य विधि सेवा प्राधिकरण, मुंबई, यांना वितरित करण्यास आणि खर्च करण्यास, याद्वारे, मंजूरी देण्यात येत आहे.

२. उक्त खर्च हा गृह विभाग-मागणी क्रमांक बी-१, २०५५, पोलीस, (०८) बळी पडलेल्या व्यक्तींकरिता नुकसानभरपाई निधी, (०८)(०१) गुन्ह्यामध्ये बळी पडलेल्या व्यक्तीस किंवा त्याच्या कुटुंबियांना नुकसानभरपाई (२०५५ ०६७८), ३१, सहायक अनुदान (वेतनेतर), याखाली चालू (सन २०१७-१८) वित्तीय वर्षात उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय, अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३५९/अर्थ-११, दिनांक ०७.१०.२०१७, द्वारे मिळालेल्या वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१७१११५१६०४०७२३२९ असा आहे. हा शासन निर्णय डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Gopal Borse

Digitally signed by Swapnil Gopal Borse
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=66835707253ff77ef0e333eb3ad582f9b876d443b2654088832e43dcad21c52a, cn=Swapnil Gopal Borse
Date: 2017.11.15 16:07:35 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा/ विधानपरिषद, यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
४) मा. राज्यमंत्री (गृह-शहरे) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. राज्यमंत्री, गृह (ग्रामीण), वित्त व नियोजन, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मुंबई.
८) प्रबंधक, मा. मुंबई उच्च न्यायालय, मुंबई/ नागपूर खंडपीठ, नागपूर/ औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद.
९) सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य विधि सेवा प्राधिकरण, मुंबई.
१०) सचिव, सर्व जिल्हा विधि सेवा प्राधिकरणे *(सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य विधि सेवा प्राधिकरण, मुंबई, यांच्या मार्फत).*
११) प्रबंधक, सर्व जिल्हा व सत्र न्यायालये.
१२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
१३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
१४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१५) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
१६) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१७) अवर सचिव (अर्थ-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८) कार्यासन अधिकारी (व्यय-७/ अर्थ-११), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९) निवड फाईल, पोल-७.